


# झाडं लावणारा माणूस

जाँ जिओनो

अनुवाद
माधुरी पुरंदरे

# झाडं लावणारा माणूस



# झाडं लावणारा माणूस

**मूळ फ्रेंच लेखक - जाँ जिओनो**

अनुवाद, मुखपृष्ठ व आतील चित्रे
माधुरी पुरंदरे

झाडं लावणारा माणूस
मूळ फ्रेंच लेखक : जाँ जिओनो
अनुवाद : माधुरी पुरंदरे

प्रकाशक : दिलीप माजगावकर
राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे - ४११ ०३०
फोन - (०२०) ४४७३४५९. E-mail : rajhans1@pn2.vsnl.net.in

मुद्रक : साप्ताहिक मुद्रण
१०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे - ४११ ०३०

© लेखकाधीन

अक्षरजुळणी : रेखा ढोले
प्रिन्ट लिंक, ७६९/५, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४

मुखपृष्ठ व आतील चित्रे : माधुरी पुरंदरे


आवृत्ती पहिली : ऑगस्ट २००१
आवृत्ती दुसरी : मे २००३

ISBN 81-7434-213-3


**किंमत : २५ रुपये**

*Published with the aid of the Ministry of Foreign Affairs, France*

*With Special Thanks to Gallimard Publication for timely Copperation*




एखाद्या माणसाच्या व्यक्तिमत्वामधले
खरोखरीचे असामान्य गुण स्पष्ट दिसायला हवे
असतील तर अनेक वर्षं त्या व्यक्तीच्या कामाचं
निरीक्षण करण्याचं सौभाग्य लाभावं लागतं.
जर त्या व्यक्तिचं काम कसल्याही अहंकारापासून
मुक्त असेल, त्या कामामागली कल्पना
अतुलनीय अशा औदार्यभावनेतून स्फुरलेली
असेल, कसल्याही प्रकारच्या परतफेडीची तिथे
अपेक्षा नसेलच, उलट पुसता न येण्यासारख्या
खुणाच त्याने या जगामध्ये मागे ठेवलेल्या
असतील, तर आपण एका अविस्मरणीय
व्यक्तिसमोर आहोत याबद्दल जराही संदेह
बाळगण्याचं कारण नाही.



प्रोव्हॉन्समधे आत घुसलेल्या ह्या आल्पसच्या प्राचीन प्रदेशात, हौशी प्रवाशांना अगदी अपरिचित असणाऱ्या उंचीवर चाळीस एक वर्षांपूर्वी मी पायी भटकत होतो.

ह्या प्रदेशाची दक्षिण आणि आग्नेय सीमा द्युरांसच्या प्रवाहां आखलेली आहे. एका बाजूला सिस्तरों आणि मिरावो आहेत. उत्तरेला द्रोमचा तिच्या उगमापासून दी पर्यंतचा प्रवाह आहे. पश्चिमेला कोन्ता व्हेनेसँचं पठार आणि मोव्हॉन्तूची रांग. बास-आल्पस प्रांताचा संपूर्ण उत्तर भाग, द्रोमचा दक्षिणेचा तुकडा आणि व्होक्ल्यूजचा एक लहानसा भाग असा मिळून हा प्रदेश आहे.







त्या वैराण, निर्जन प्रदेशात मी जेव्हा फिरत होतो तेव्हा तो ओसाड आणि रुक्ष असा, १२०० ते १३०० मीटर उंचीवरचा मोकळा माळ होता. रानटी लव्हेंडर या वनस्पती खेरीज तिथे काहीही उगवत नव्हतं.

अशा ह्या प्रदेशात तीन दिवस चालल्यानंतर मी कमालीच्या उजाड अशा ठिकाणी  पोहोचलो. एका वस्तीच्या निर्मनुष्य सांगाड्याजवळ मी माझा तंबू ठोकला. आदल्या दिवसापासून माझ्याजवळचं पाणी संपलं होतं, आणि आता ते मिळवणं आवश्यक होतं. गांधीलमाश्यांनी सोडून दिलेल्या पोळ्यासारख्या, पडझड झालेल्या त्या मातीच्या घरांकडे पाहून मला वाटत होतं की तिथे कुठेतरी कधीकाळी एखादा झरा किंवा विहीर असली पाहिजे. तसा झरा होता खरा, पण सुकला होता. छत नसलेली, वाऱ्यानं आणि पावसानं कुरतडलेली पाच-सहा घरं, घंटेचा मनोरा पडून गेलेलं चर्च, हे सगळं कुठल्याही गावातली घरं आणि देऊळ असतं तसंच होतं; मात्र जीवनाची कसलीही खूण तिथे उरलेली नव्हती.




जूनमधला लख्ख उन्हाचा तो एक छान दिवस होता. पण उंचीवरच्या, कुठेही कसलाही आडोसा नसलेल्या ह्या भूमीवर असह्य वारा पिसाटल्यासारखा सुटलेला होता. घरांच्या सांगाड्यांमधून त्याचं घोंगावणं शिकारीवर ताव मारत असताना डिवचल्या गेलेल्या एखाद्या रानटी श्वापदासारखं चवताळलेलं वाटत होतं.

मला तंबू उठवावा लागला. तिथून पुढे पाच तासांची पायपीट केली, पण अजूनही मला पाणी मिळालेलं नव्हतं आणि मिळण्याची काही चिन्हंही दिसत नव्हती. सर्वत्र तोच शुष्कपणा, तीच निष्पर्ण झुडपं. दूर अंतरावर मला एक छोटीशी, काळी, उभी आकृती दिसल्यासारखं वाटलं. तो एखाद्या एकाकी झाडाचा बुंधा असेल असा माझा समज झाला.

अगदी सहज म्हणून मी त्या दिशेनं गेलो. ती आकृती म्हणजे एक मेंढपाळ होता. त्याच्याभोवती, पोळून काढणाऱ्या जमिनीवर, तीसेक मेंढ्या बसलेल्या होत्या.

त्यानं त्याच्या पाण्याच्या बाटलीतून मला पाणी दिलं आणि थोड्या वेळानंतर पठाराच्या एका खोलगट भागात असलेल्या मेंढवाड्याकडे नेलं. तिथल्या एका अतिशय खोल अशा नैसर्गिक विवरातून ते अप्रतिम चवीचं पाणी तो शेंदत असे. त्या विवरावर त्यानं एक ओबडधोबड रहाट बसवला होता.


हा गृहस्थ थोडकंच बोलत होता. एकटं राहणाऱ्याचं असंच असतं. पण त्याला स्वत:बद्दल खात्री आणि विश्वास होता असं जाणवत होतं. सभोवतालचा उजाड प्रदेश पाहता हे मला अंमळ चमत्कारिक वाटलं. तो झोपडीत राहत नव्हता, तर दगडाच्या एका खऱ्याखुऱ्या घरात राहत होता. त्या प्रदेशात तो वस्तीला आला तेव्हा मोडकळलेल्या अवस्थेत असलेल्या त्या घराची डागडुजी करण्याकरता त्यानं स्वत: घेतलेले परिश्रमही दिसत होते. घराचं छप्पर भक्कम आणि निगळ होतं. त्याच्या कौलांवर आदळणारा वारा समुद्रासारखा गाजत होता.



त्याचा संसार नेटका होता, भांडीकुंडी घासलेली होती, केर काढलेला होता, बंदुकीला तेलपाणी केलेलं होतं. शेगडीवर त्याचं सूप उकळत होतं. मग माझ्या लक्षात आलं की तो स्वत:ही दाढी वगैरे केलेला, तवाना दिसत होता. कपड्याच्या सर्व गुंड्या घट्ट शिवलेल्या होत्या आणि अतिशय काळजीपूर्वक, नजरेला पटकन दिसूही नये असं रफूकाम कपड्यांना केलेलं होतं.


त्यानं मला त्याच्यातलं थोडं सूप दिलं. मी जेव्हा माझा तंबाखूचा बटवा पुढे केला तेव्हा त्यानं आपण धूम्रपान करत नाही असं सांगितलं. त्याचा कुत्रा त्याच्यासारखाच शांत होता. आब न सोडता रखवाली करत सगळीकडे नजर ठेवून होता.


सर्वांत जवळचं गाव दीड दिवसाच्या वाटचालीच्या अंतरावर होतं, त्यामुळे मी ती रात्र त्या मेंढपाळाच्या घरीच काढणार हे स्पष्ट होतं. शिवाय, या प्रदेशात क्वचितच आढळणाऱ्या गावांची प्रकृती माझ्या चांगल्याच परिचयाची होती. एकमेकांपासून दूर, ह्या पठाराच्या दोन बाजूंना, गाडीरस्त्याच्या टोकाशी असलेल्या सफेद्यांच्या विरळ झाडीत ती चार-पाच गावं वसलेली होती. लाकडापासून कोळसा बनवणाऱ्या लाकूडतोड्यांची तिथे वस्ती होती. जगणं अति खडतर असलेला हा प्रदेश आहे. हिवाळा असो की उन्हाळा, नेहमीच कमालीचं कठोर असलेल्या हवामानामुळे



एकमेकांना चिकटून राहणाऱ्या कुटुंबांचा सगळा बंदिस्त अहंकार अधिकच तीव्र होतो. ह्या जागेपासून दूर पळावं अशा सततच्या इच्छेमुळे त्यांच्या गैरवाजवी महत्त्वाकांक्षा ताळतंत्रच सोडतात. पुरुषमाणसं ट्रकमधून आपला कोळसा विकायला शहरात जातात आणि परत येतात. गरम-गार पाण्याच्या आलटूनपालटून अंगावर पडणाऱ्या फवाऱ्यासारख्या ह्या हवामानात, माणसातल्या भक्कम गुणांनाही धस लागतो. बायका कडवटपणा मनात उबवत राहतात. कोळशाच्या विक्रीपासून ते चर्चमध्ये प्रार्थनेसाठी बाकावर बसायला जागा मिळवण्यापर्यंत, आपसात झगडणाऱ्या सदगुणांसाठी, परस्परांशी भांडणाऱ्या दुर्गुणांसाठी आणि गुण-दुर्गुणांच्या सर्वसाधारणपणे सतत होणाऱ्या मिसळणीसाठी, प्रत्येक गोष्टीसाठी स्पर्धा असते. भरीला अविश्रांत घोंगावणारा वाराही डोकं फिरवतो.

इथे आत्महत्या करण्याची साथ येते
आणि बहुतेक वेळी मृत्यूच्या दिशेला
नेणारे वेड लागण्याचे प्रकारही
अनेक होतात.





धूम्रपान न करणारा तो मेंढपाळ एक छोटी पिशवी घेऊन आला आणि त्यानं त्यातल्या सफेद्याच्या फळांचा ढीग टेबलावर ओतला. ती एकामागून एक खूप बारकाईनं ती पारखून घेत त्यानं चांगल्या अन् खराब फळांचे वेगळे ढीग केले. मी माझा पाईप ओढत होतो. मदत करू का असं विचारलं तर तो म्हणाला, हे माझं काम आहे. आणि खरोखर तो ज्या निगुतीनं ते करत होता ते पाहून मीही मग आग्रह धरला नाही. आमच्यातला संवाद एवढाच. चांगल्या फळांचा बऱ्यापैकी मोठा ढीग झाल्यावर त्यानं त्यांचे दहा-दहाचे वाटे केले. हे करत असताना त्यातूनही लहान आकाराची किंवा हलक्या चिरा गेलेली फळं तो काढून टाकत होता. कारण तो अगदी जवळून त्यांचं निरीक्षण करत होता. जेव्हा त्याच्यासमोर निर्दोष अशी शंभर फळं जमा झाली तेव्हा त्यानं काम थांबवलं आणि आम्ही झोपायला गेलो.

ह्या माणसाच्या सहवासात शांत वाटत होतं. दुसऱ्या दिवशी सकाळी मी आणखी एक दिवस तिथे थांबण्याची परवानगी त्याच्यापाशी मागितली. त्याच्या दृष्टीनं ते अगदी स्वाभाविकच होतं. किंबहुना, नेमकं सांगायचं तर, मला अशी जाणीव झाली की त्याला कशाचाही त्रास होऊ शकत नव्हता, काहीही त्याचं चित्त विचलित करू शकत नव्हतं. खरं तर माझ्या दृष्टीनं विश्रांती अत्यावश्यक नव्हती, पण माझी उत्सुकता चाळवली गेली होती आणि मला त्या माणसाबद्दल अधिक माहिती करून घ्यायची होती. त्यानं मेंढ्यांचा कळप बाहेर काढला आणि त्यांना तो चारायला घेऊन गेला. काळजीपूर्वक निवडून आणि मोजून ठेवलेल्या त्या फळांची छोटी थैली निघण्यापूर्वी त्यानं बादलीतल्या पाण्यात बुचकळून घेतली.


एक अंगठ्याएवढी जाड, दीडेक मीटर उंचीची लोखंडी कांब त्यानं काठी म्हणून बरोबर घेतलेली मी पाहिली. मी रमत गमत, आरामात फिरायला निघाल्याचा बहाणा केला आणि ज्या वाटेनं तो चालत होता त्या वाटेला समांतर अशा वाटेनं मीही निघालो. एका खोलगट घळीसारख्या ठिकाणी कुरण होतं. त्यानं आपला छोटासा कळप कुत्र्याच्या देखरेखीखाली चरायला सोडला आणि मी होतो त्याच दिशेनं तो वर यायला लागला. माझ्या भोचकपणाबद्दल आपली नाराजी दाखवायला तो येतोय असं मला वाटलं, पण तसं नव्हतं. तो त्याचा रस्ताच होता. तिथून दोनेकशे मीटर उंचीवर असणाऱ्या एका ठिकाणी तो चालला होता. त्यानं मलाही बरोबर येण्याविषयी विचारलं.






इच्छित ठिकाणी पोचल्यावर त्यानं हातातल्या लोखंडी कांबीनं जमिनीत खणायला सुरुवात केली. खड्डा पाडल्यावर तो त्यात सफेद्याचं एक फळ टाकून खड्डा बुजवून





टाकीत होता. मी विचारलं, जमीन तुमची आहे का? त्यावर तो म्हणाला, नाही. कुणाची आहे ठाऊक आहे? त्याला ठाऊक नव्हतं. त्याच्या मते ती सामाईक मालकीची, किंवा कदाचित तिच्याबद्दल फिकीर नसलेल्या कुणाच्यातरी मालकीची असावी. मालकाचं नाव जाणून घेण्यात त्याला रस नव्हता. जवळची शंभर फळं त्यानं अतिशय नीट, काळजीनं जमिनीत पेरली.



दुपारचं जेवण झाल्यावर त्यानं आपलं फळं निवडीचं काम पुन्हा सुरू केलं. मी बहुतेक फारच चिकाटीनं प्रश्न विचारत होतो, कारण तो त्यांची उत्तरं देत होता. तीन वर्षांपासून ह्या एकांतवासात राहून तो रोपांची लागवड करत होता. त्यानं एकंदर एक लाख झाडं लावली होती. त्या एक लाखापैकी वीस हजार जगली होती. त्या वीस हजारांपैकीही कीड, उंदीर वगैरेंच्या उपद्रवामुळे, किंवा ज्याबद्दल पूर्वअटकळ बांधणं अशक्य असं त्या देवजीच्या मनी जे जे येतं त्या सगळ्यामुळे, निम्मीच जगतील असा त्याचा हिशेब होता. म्हणजे उरले सफेद्याचे दहा हजार वृक्ष. जिथे तोपर्यंत कधीही काहीही उगवलेलं नव्हतं तिथे ते दहा हजार वृक्ष उगवणार होते.

हे ऐकल्यावर मात्र मला त्या माणसाच्या वयाबद्दल प्रश्न पडला. पन्नाशी ओलांडलेली होती हे तर दिसतच होतं. पंचावन्न, तो म्हणाला. त्याचं नाव एलझेआर बुफिए. पठारावर त्याच्या मालकीची बागायती होती. तिथेच त्याचं आयुष्य घडलं होतं.

त्याच्या एकुलत्या एक मुलचा मृत्यू झाला होता, आणि पाठोपाठ पत्नीचाही. त्यानं मग हा एकांतवास स्वीकारला होता आणि आपल्या मेंढ्या आणि कुत्र्याच्या सोबतीनं तो आयुष्य संथपणे जगण्यात समाधान मानत होता. हा प्रदेश झाडांविना मरणपंथाला लागला आहे असं त्याचं म्हणणं होतं. तो म्हणाला की करण्यासारखा




फारसा महत्त्वाचा असा काही उद्योग मागे नसल्यामुळे इथल्या ह्या परिस्थितीत सुधारणा करण्याची जबाबदारी त्यानं आपल्या अंगावर घेतली होती.

मी स्वत: तेव्हा तरुण असूनही सड्याफटिंगाचं जिणं जगत असल्यामुळे अशा एकट्या लोकांच्या काळजाला स्पर्श करणं मला जमत होतं. पण मी एक चूक केली. नेमक्या या तरुण वयामुळेच भविष्याचा विचार मी केवळ स्वत:च्या संदर्भात आणि सुखाचा शोध घेण्यासंदर्भात करत होतो. मी त्या मेंढपाळाला म्हणालो की, पुढल्या तीस वर्षांत ही सफेद्याची दहा हजार झाडं छान फोफावतील. अत्यंत साधेपणानं तो उत्तरला की, परमेश्वरानं मला आयुष्य दिलं तर पुढल्या तीस वर्षांमध्ये मी इतकी झाडं लावलेली असतील की दहा हजार झाडं म्हणजे समुद्रातला एक थेंब ठरेल. किंबहुना तो तेव्हाच बीच वृक्षांच्याही लागवडीचा अभ्यास करत होता आणि त्याच्या घराजवळ बीचच्या फळांची एक रोपवाटिकाही त्यानं तयार केली होती. जाळीचं कुंपण घालून त्यानं त्या सुंदर हिरव्या प्रजेचं आपल्या मेंढ्यांपासून रक्षण केलं होतं. शिवाय माळरानात खोलगट भागात भूर्जपत्राची लागवड करण्याचाही त्याचा विचार चालू होता. तिथे भूपृष्ठापासून काही मीटर खाली निद्रिस्त ओल आहे असं त्यानं मला सांगितलं.

दुसऱ्या दिवशी आम्ही एकमेकांचा निरोप घेतला.





त्याच्या पुढच्या वर्षी पहिलं महायुद्ध चालू झालं आणि मी पाच वर्षं त्यात गुंतून पडलो. सैनिकाला झाडाबिडांचा विचार करायला फुरसतच कुठली? खरं सांगायचं तर, ती मेंढपाळाची गोष्ट माझ्या मनावर काही फारसा परिणाम ठेवून गेलीच नव्हती. मला तो मेंढपाळ थोडासा नादिष्ट वाटला होता. पोस्टाच्या तिकिटांचा संग्राहक जेवढा नादिष्ट असतो तेवढाच, आणि मी त्याला विसरूनही गेलो होतो.

युद्ध संपलं. लष्करातून बाहेर पडताना मला मोबदला म्हणून लहानशीच रक्कम मिळाली, पण जरा ताज्या हवेत श्वास घ्यावा ह्या इच्छेनेही पुन्हा जोरात उसळी घेतली. कसलीही योजना न आखता मी पुन्हा एकदा त्या निर्जन प्रदेशाची वाट पकडली.

काही बदललं नव्हतं. नाही म्हणायला, त्या निर्मनुष्य खेड्याच्या वरच्या अंगाला, दूरवरच्या उंचवट्यावर, गालिचा पसरलेला असावा तसं एका प्रकारचं करड्या रंगाचं धुकं मला दिसलं.


आदल्या दिवसापासून मला त्या झाडं लावणाऱ्या मेंढपाळाची आठवण येत होती. सफेद्याचे दहा हजार वृक्ष म्हणजे बराच मोठा प्रदेश.... मी विचार करत होतो.

पाच वर्षांमध्ये मी इतकी माणसं मरताना पाहिली होती की एलझेआर बुफिएंच्याही मृत्यूची कल्पना माझ्या मनात सहज येऊन गेली. शिवाय आपण विशीत असतो तेव्हा पन्नाशीची माणसं आपल्याला म्हातारी वाटतात आणि आता मरण्याशिवाय ती दुसरं काय करू शकणार असंही वाटतं. पण बुफिए जिवंत होते. किंबहुना, ते चांगले टुणटुणीत होते. त्यांनी व्यवसाय बदलला होता. आता त्यांच्याकडे कोकरं चारच होती, पण शंभरेक मधाची पोळी होती. मेंढ्या रोपांची नासधूस करत असल्यामुळे त्यांनी त्या पाळणं बंद केलं होतं. बाहेर चाललेल्या लढाईची त्यांना यत्किंचित फिकीर नव्हती असं त्यांनी मला सांगितलं (आणि मलाही ते दिसतच होतं) जराही विचलित न होता त्यांचं वृक्षारोपण चालू होतं.




१९१० सालचे सफेदा आता दहा वर्षांचे झाले होते आणि आम्हा दोघांहून उंच झाले होते. ते दृश्य विलक्षण होतं. माझी अक्षरश: वाचाच गेली होती आणि बुफिएही अबोलच असल्यानं अख्खा दिवस आम्ही मुक्यानं त्या जंगलात फिरण्यात घालवला. तीन तुकड्यांत मिळून जंगलाची सर्वाधिक लांबी अकरा किलोमीटर होती. कसलंही तंत्रसाहाय्य नसलेल्या ह्या एका माणसाच्या हातांनी आणि आत्मबळानं हे सारं निर्माण केलं होतं हे पाहिलं आणि विनाशाखेरीज इतरही बाबतींत माणसं परमेश्वराइतकीच कार्यक्षम होऊ शकतील असं जाणवलं.

बुफिएंनी आपल्या त्या वेळच्या कल्पनेचा पाठपुरावा केला होता आणि माझ्या खांद्याएवढ्या उंचीचे, नजर पोचेल तिथवर पसरलेले सफेदा त्याची साक्ष देत होते.






ओक वृक्ष फोफावले होते आणि किडीच्या धास्तीत जगण्याचं वय त्यांनी ओलांडलं होतं. आता त्यांचा नाश घडवून आणायचा तर ईश्वरी अवकृपेलाही वादळांचीच मदत घ्यावी लागली असती. त्यांनी पाच वर्षांपूर्वी, म्हणजे १९१५ मध्ये - तेव्हा मी व्हेरदँमध्ये लढत होतो - लावलेल्या भूर्जपत्रांच्या देखण्या वाटिका दाखवल्या. जिथे जिथे म्हणून जमिनीत पृष्ठभागापर्यंत ओलावा आहे अशी त्यांची अटकळ होती त्या सर्व खोलगट जागा त्यांनी लावलेल्या वाटिकांनी व्यापून टाकल्या होत्या. रोपं वयात येत असल्यासारखी कोवळी आणि सुदृढ दिसत होती.



ही सगळी निर्मिती एकातून दुसरं निघावं तशी, साखळीसारखी चालू असावी असं दिसत होतं. बुफिएंना मात्र त्याची काही जाणीव नव्हती. ते आपलं काम चिकाटीनं, साधेपणानं करत होते. पण गावाकडून खाली उतरताना मला काही झऱ्यांना पाणी असल्याचं दिसलं. माणसांना आठवतंय तेव्हापासून ते कोरडेच होते. निसर्गाच्या प्रतिक्रियेचं ते सर्वोत्कृष्ट उदाहरण मला पाहायला मिळालं. खूप प्राचीन काळी ह्या झऱ्यांना पाणी होतं.


माझ्या लेखाच्या सुरुवातीला मी ज्या उदासवाण्या, उजाड गावांबद्दल सांगितलं, त्यातली काही प्राचीन काळच्या गॅलो-रोमन गावांच्याच जागेवर वसलेली होती. त्या प्राचीन गावांच्या खाणाखुणा अद्याप शिल्लक होत्या. विसाव्या शतकात जिथे थोड्याशा पाण्यासाठी सुद्धा माणसांना पावसाच्या साठलेल्या पाण्यावर अवलंबून रहावं लागत होतं त्याच जागी संशोधन करताना पुरातत्त्व शास्त्रज्ञांना काही माशाचे गळ सापडले होते.

वाऱ्यामुळेही बी विखरून पडत होतं. ज्या वेळी झऱ्यांना पाणी पुन्हा लागलं त्याच वेळी वाळुंजा, डॉगवुड (छोटा लवचिक वाळुंजा), कुरण, बनं, फुलं, वाढू लागली आणि जीवनाचं चक्रच सुरू झालं.



पण हा बदल इतका संथ होता की कसलेही धक्के न देता तो हळूहळू सवयीचा होत होता. अधूनमधून सशांच्या किंवा रानडुकरांच्या मागून शिकारी या निर्जन प्रदेशात येत. त्यांच्याही नजरेला छोट्या झाडांची ही दाटी जाणवली होती, पण निसर्गाची लहर असं म्हणून त्यांनी दुर्लक्ष केलं होतं. त्यामुळे बुफिएंच्या ह्या कलाकृतीच्या वाटेला कुणी जात नव्हतं. त्यांच्याबद्दल नुसती शंका आली असती तरी कुणीतरी त्यांना हटकलंच असतं. पण शंका घेणं अशक्य होतं. गावकरी किंवा प्रशासनातल्या कुणालाही ह्या विलक्षण औदार्यातल्या चिकाटीची कल्पना तरी करता येणं शक्य होतं का?

१९२० पासून एलझेआर बुफिएंना भेटल्याशिवाय माझं एक वर्षही गेलं नाही. कधीही मी त्यांना खचलेले पाहिलं नाही की साशंकही पाहिलं नाही. त्यांचं नैराश्य माझ्या तरी नजरेला कधी आलं नाही.



पण तरीही, असं
यश मिळवण्यासाठी
किती अडथळे पार करावे
लागले असतील. अशा वेडातून अखेर यश
मिळेल याची खात्री होईपर्यंत निराशेशी किती झगडावं लागलं
असेल याचीही कल्पना करता येते. एका वर्षी त्यांनी दहा हजाराहून जास्त
मॅपल वृक्ष लावले होते. सगळे मेले. पुढच्या वर्षी मॅपल सोडून देऊन त्यांनी पुन्हा
बीच लावले अन् ते सफेद्यांपेक्षाही चांगले वाढले.

ही जगावेगळी असामी काय प्रतीची होती हे जास्तीत जास्त नेमकेपणानं समजून घ्यायचं असेल तर हे गृहस्थ संपूर्णपणे एकट्यानं काम करत होते हे आपल्याला विसरून चालणार नाही. इतके एकटे की, आयुष्याच्या अखेरीस त्यांना बोलण्याची सवयच उरली नव्हती. किंवा, कदाचित् त्यांना त्याची गरजही वाटत नसेल, कुणी सांगावं?





१९३३ मध्ये एका सरकारी वनरक्षकाशी त्यांची गाठ पडली. तो ती हिरवाई पाहून अचंबितच झाला होता. ह्या 'नैसर्गिक' वनराजीला धोका पोहोचेल, तेव्हा उघड्यावर शेकोटी करू नका, अशी ताकीद त्या शासकीय कर्मचाऱ्यानं बुफिएंना दिली. तो भाबडेपणाने त्यांना म्हणाला की, आपोआप वाढलेलं एवढं जंगल मी प्रथमच पाहतोय. त्या काळात बीचची लागवड करायला बुफिए आपल्या घरापासून पायी बारा किलोमीटरपर्यंत जात होते. वयाची पंचाहत्तरी आली होती, त्यामुळे, रोज ये-जा करणं टाळण्यासाठी, जिथे लागवड सुरू होती तिथेच एखादं दगडी खोपट बांधून राहण्याचा त्यांचा बेत होता, आणि पुढच्या वर्षी त्यांनी तो प्रत्यक्षात आणलाही.

१९३५ मध्ये प्रशासकीय अधिकाऱ्यांची एक समिती 'नैसर्गिक वनसंपत्ती' ची पाहणी करण्याकरता आली. त्यात एक वन आणि जलतज्ज्ञ होता. एक संसद सदस्य आणि काही तंत्रज्ञ होते. त्यांनी बरीच वायफळ बडबड केली. काहीतरी केलं पाहिजे असं ठरवलं. ते जंगल शासनाच्या देखरेखीखाली घेऊन तिथे




कोळशासाठी लाकूडतोडीला बंदी घालण्याचा एक उपयुक्त निर्णय सोडला तर त्यांनी दुसरं काही सुदैवानं केलं नाही. यौवनानं सळसळणाऱ्या रसरशीत वृक्षराजीच्या सौंदर्यानं कुणी मोहित न होणं शक्यच नव्हतं, आणि त्या जंगलाची मोहिनी त्या संसद सदस्यावरच पडली होती.

ह्या समितीत असलेला एक वनाधिकारी माझ्या परिचयाचा होता. मी त्याला सगळं रहस्य उलगडून सांगितलं. एका आठवड्यानंतर आम्ही दोघंही एल्झेआर बुफिएंच्या शोधात निघालो. समितीनं ज्या जागेचं निरीक्षण केलं होतं तिथून वीस किलोमीटर अंतरावर ते कामात गढून गेलेले आम्हाला सापडले.

ह्या वनाधिकारी माझा मित्र उगाच नव्हता. त्याला कुठल्या गोष्टीचं काय मोल असतं याची जाण होती. तो काहीही बोलला नाही. बरोबर नेलेलं अन्न आम्ही सर्वांनी वाटून खाल्लं आणि मुकेपणानं निसर्गाचं निरीक्षण करण्यात काही तास घालवले.





ज्या दिशेनं आम्ही आलो होतो तो प्रदेश सहा ते सात मीटर उंचीच्या वृक्षांनी आच्छादलेला होता. १९१३ मध्ये ह्या प्रदेशाचं मला घडलेलं दर्शन मला आठवत होतं.... वाळवंट!



शांत आणि नियमित काम, उंचावरची उत्साहवर्धक हवा, साधं आयुष्य आणि सर्वांत महत्त्वाची म्हणजे मन:शांती. ह्या सगळ्यामुळे म्हाताऱ्याची तब्येत लोखंडासारखी कणखर झाली होती. देवाघरूनच मिळालेलं पीळदार शरीर होतं त्याचं. अजून किती हेक्टर जमिनीवर हा झाडं लावणार आहे असा मला प्रश्न पडला.

निघण्यापूर्वी माझ्या मित्रानं तिथल्या मातीमधे वाढू शकणाऱ्या विशिष्ट जातीच्या वृक्षांबद्दल एक सूचना केली, पण आग्रह न धरता. ''कारण ह्या गृहस्थाला त्यातलं माझ्याहून जास्त कळतं,'' मला तो नंतर म्हणाला. तासभर चालल्यानंतर तो पुन्हा म्हणाला, ''त्यांना कुणाहीपेक्षा त्यातलं खूप जास्त कळतं. आनंदाचा ठेवाच त्यांना सापडलेला आहे.''

माझ्या अधिकारी मित्रामुळे केवळ जंगलालाच नव्हे, तर म्हाताऱ्याच्या आनंदालाही संरक्षण मिळालं. त्यानं त्या जंगलात तीन वनरक्षकांची नेमणूक केली आणि त्यांना असा काही सज्जड दम भरला, की लाकडं तोडण्यासाठी येणाऱ्यांनी दाखवलेल्या कुठल्याही आमिषाला त्यांनी कधी भीक घातली नाही.

१९३९ च्या महायुद्धाच्या काळात मात्र ह्या हिरव्यागार कलाकृतीचं अस्तित्व धोक्यात येण्याची लक्षणं दिसू लागली. त्या काळी वाहनं कोळसा जाळून मिळणाऱ्या गॅसवर चालत असल्यामुळे लाकूडफाटा कधीच पुरा पडत नसे. १९१० मध्ये लावलेल्या सफेद्यांची त्याकरता तोड सुरू झाली. परंतु मुख्य रस्त्यांच्या जाळ्यापासून हा प्रदेश इतका दूर होता की आर्थिकदृष्ट्या हा उद्योग आतबट्ट्याचा ठरायला लागला. मग तो सोडून देण्यात आला. म्हाताऱ्यानं हे काही पाहिलं नव्हतं. तो तिथून तीस किलोमीटर अंतरावर आपलं काम करत होता. १४ सालचं युद्ध जसं त्याच्या गावी नव्हतं तसं ३९ चं ही नव्हतं.







एल्झेआर बुफिएंशी माझी शेवटची भेट १९४५ मध्ये झाली. त्या वेळी त्यांचं वय सत्त्याऐंशी वर्षांचं होतं. मी पुन्हा एकदा त्या ओसाडगावाच्या प्रवासाला निघालो. पण या खेपेला युद्धामुळे देशाची दुर्दशा झालेली असूनही, ड्युरॉंसची दरी आणि डोंगर यांमध्ये ये-जा करणारी एक बससेवा सुरू होती. माझ्या सुरुवातीच्या भटकंतीत मी पाहिलेला हा प्रदेश आता मला ओळखू येईनासा झाला होता, याचं कारण बहुदा हे दळणवळणाचं तुलनेनं वेगवान असलेलं माध्यमच असावं अशी मी स्वत:ची समजूत करून घेतली. बस नव्याच मार्गानं जात आहे असंही मला वाटलं. वाटेत एका गावाचं परिचित नाव पाहिलं तेव्हा खात्री पटली की एकेकाळी निर्मनुष्य आणि उजाड असणारा हाच तो प्रदेश. बसनं मला व्हेरगोंला सोडलं.


१९१३ साली ह्या वस्तीत घरं दहा-बारा होती, पण माणसं तीनच राहात होती. ते तिघेहीजण रानटी होते, एकमेकांना पाण्यात पाहत होते आणि सापळा लावून केलेल्या शिकारीवर पोट भरत होते. साधारणपणे शरीर आणि मनानं आदिमानवाशी त्यांचं साम्य होतं. नेटल् वेल (विषारी वेल) त्यांच्या आसपासची निर्मनुष्य घरं पोखरत होती. त्यांची अवस्था अत्यंत निराशाजनक होती. मृत्यूची वाट पाहणं एवढंच त्यांच्या हाती उरलं होतं. अशी परिस्थिती सद्‌गुण, नीती-अनीती वगैरे गोष्टींना अजिबात अनुकूल नसते.








आता हे सगळं बदललं होतं. हवासुद्धा. पूर्वी माझं स्वागत करणाऱ्या कोरड्या आणि निष्ठुर, वेगवान वाऱ्याच्या फटकाऱ्यांची जागा आता झुळझुळणाऱ्या सुगंधी वाऱ्याच्या लाटांनी घेतली होती. वरच्या अंगानं पाण्यासारखा आवाज येत होता, तो रानात वाहणाऱ्या वाऱ्याचा होता. अखेरीस, सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे, मी एका कुंडात पडणाऱ्या खऱ्याखुऱ्या पाण्याचा आवाज ऐकला. कुणीतरी तिथे एक पुष्करणी केली होती, ती वाहत होती. आणि मला स्तंभित करणारी गोष्ट म्हणजे बाजूला चारेक वर्ष वयाचं धष्टपुष्ट दिसणारं लिंडेनचं झाड लावलेलं होतं. ही जीवनाच्या पुनरागमनाची निर्विवाद खूण होती.





याशिवाय, आशावादी असणाऱ्याच्याच हातून होतील अशा कामांच्या खुणा व्हेरगोंमध्ये जागोजाग दिसत होत्या. याचाच अर्थ, आशेचे किरण तिथे परतले होते. घरांचे भग्नावशेष साफ करून, ढासळलेल्या भिंतींची टोकं पाडून टाकून पाच घरं पुन्हा बांधलेली होती. वस्तीवर आता एकूण अठ्ठावीस माणसं होती, पैकी चार तरुण जोडपी होती. नव्यानं गिलावा केलेली नवी घरं; भोवती बाग, तीत भाज्या, फुलं, कोबी, गुलाब, पेअर, सेलरी, आनेमोन ओळीत आलटून-पालटून लावलेले दिसत होते. आता ते ठिकाण तिथे राहावंसं वाटावं असं झालं होतं.





तिथून पुढे मी चालत निघालो. युद्ध नुकतंच संपलेलं असल्यामुळे देशात अजून जीवन पुरतं उमललेलं नव्हतं, परंतु लाझार थडग्यातून बाहेर पडलेलं दिसत होतं. डोंगराच्या उतारावर मला छोटी शेतं दिसत होती. अरुंद दरीच्या तळाशी हिरवीगार कुरणं दिसत होती. आरोग्य आणि समृद्धीनं हा प्रदेश उजळून निघायला आठ वर्षं पुरेशी झाली होती. १९१३ मध्ये मी पाहिलेल्या मोडकळलेल्या घरांच्या जागी आता शेतकऱ्यांची गिलावा केलेली घरं उभी होती. सुखी आणि निवांत जीवनाची ती खूण होती. जंगलानं रोखून धरलेलं पावसाचं आणि बर्फाचं पाणी मिळाल्यामुळे प्राचीन झरे पुन्हा वाहू लागले होते. तिथे पाण्याचे पाट तयार करण्यात आले होते. प्रत्येक घराशेजारी मॅपलच्या पुंजक्यात पाण्याच्या हौदातलं पाणी ताज्या पुदिन्याच्या गालिचावर ओसंडून वाहत होतं. हळूहळू गावांची पुनर्बांधणी झाली. जमिनीच्या किंमती जिथे वाढलेल्या होत्या अशा सपाट प्रदेशाकडून येऊन लोक इकडे स्थायिक होऊ लागले; येताना तारुण्य, उत्साह, उद्योग, धाडसी मनं घेऊन आले. आता खाऊनपिऊन सुखी असणारे स्त्रीपुरुष रस्त्यात भेटतात. हसणारी, बागडणारी

मुलं-मुली भेटतात. ग्रामीण सण-उत्सवांची त्यांना आता गोडी लागली आहे. पूर्वीचे रहिवासी शांतपणे राहायला लागल्यापासून आता ते ओळखू येईनासे झालेत. नव्यानं आलेल्या दहा हजारांहून अधिक माणसांच्या सुखाचं कारण एलझेआर बुफिए आहेत.

समाधानी जीवन जगत असल्यामुळे आता ओळखू येईनासे झालेले जुने रहिवासी आणि नव्यानं येऊन स्थायिक झालेले, असे मिळून दहा हजारांवर माणसांच्या सुखाचं श्रेय एलझेआर बुफिएंकडे जातं.


एक एकटा माणूस, केवळ आपलं शरीर आणि मानसिक सामर्थ्य एवढीच सामग्री घेऊन एका वैराण प्रदेशाचा कायापालट घडवून आणायला पुरेसा असतो हे पाहिलं की वाटतं काही असो, माणूस हे रसायन अजब आहे. पण त्यासाठी केवढी चिकाटी, मनाची केवढी ताकद आणि निष्ठा लागली हे जाणवताच ह्या अडाणी, असंस्कृत शेतकऱ्याबद्दलच्या आदरानं मन भरून येतं.

१९४७ साली बानोंच्या इस्पितळात एलझेआर बुफिएंना शांत मरण आलं.



## माधुरी पुरंदरे यांची अन्य पुस्तके

- कथासंग्रह
  - त्वान आणि इतर कथा
    मूळ लेखक : गी द मोपासाँ
- नाटक
  - वेटिंग फॉर गोदो
    मूळ लेखक : सॅम्युअल बेकेट
- मुलांसाठी
  - सुपरबाबा व इतर कथा
  - शाम्याची गंमत व इतर कथा
  - जादूगार व इतर कथा
  - शब्दबंध (संच)
    फुगला टम्
    पास की नापास
    टिपिक पाँ भर्रर
    मी सापडवलं आहे!
    अशी पानं तशी पानं



एखाद्या माणसाच्या व्यक्तिमत्वामधले खरोखरीचे असामान्य गुण स्पष्ट दिसायला हवे असतील तर अनेक वर्ष त्या व्यक्तीच्या कामाचं निरीक्षण करण्याचं सौभाग्य लाभावं लागतं.

पानाफुलांवर, पशुपक्ष्यांवर, जमिनीवर आणि माथ्यावरील आकाशावर अबोल प्रेम करणाऱ्या एका विलक्षण माणसाची ही कथा आहे. जाँ जिओनो यांच्या या चिमुकल्या कथेनं जगभराच्या लहान-थोर वाचकांवर मोहिनी घातलेली आहे.

राजहंस प्रकाशन / पुणे